# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२९४/२०१०/२१

तक्रार दाखल दिनांक :- ०२/०७/२०१०
निकाल दिनांक :- २५/०८/२०१०

डॉ.धर्मापुरीकर प्रभाकरराव नारायणराव,
वापर करणार - उत्तम नारायणराव कुलकर्णी,
कासराळीकर.मानक कॉम्पलेक्स ए.४,
बी.एड.कॉलेज जवळ, पदमपुरा,
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००१०६७३६४७) अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत शहर विभाग औरंगाबाद.

गैरअर्जदार

| | | |
|---|---|---|
| कोरम | प्रदीप. अ. सगणे | अध्यक्ष / सदस्य सचिव |
| | विलासचंद्र सु. काबरा | सदस्य |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे.अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०२/०७/२०१० रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) व नोडल अधिकारी,औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २०/०७/२०१० रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) ग्राहकाने महावितरण कंपनीकडुन मानिक कॉम्पलेक्स पदमपुरा औरंगाबाद येथे घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला आहे. ग्राहकाचे मीटर माहे मार्च २००८ व नोव्हेंबर २००८ मध्ये महावितरण कंपनीने बदली केलेले आहे. ग्राहकास माहे डिसेंबर २००८ चे अवास्तव वीज देयक रुपये १९,९९०/- देण्यात आले.त्याबाबतीत ग्राहकाने महाविरतण कंपनीकडे लेखी तक्रार केली असता ग्राहकाकडुन तात्परते वीज देयक रुपये ४००/- भरणा करुन घेण्यात आले.त्यानंतर प्रत्येक महीन्यात ग्राहकाने महावितरण कंपनीचे संबंधित कार्यालयात भेटुन वीज बिलाबद्दल तक्रार दाखल केली परंतु प्रत्येक महीन्यात तात्पुरते वीज देयक भरण्यास सांगुन त्यांचे मुळ देयक दुरुस्त करण्यात आले नाही.त्यामुळे ग्राहकाने दिनांक ०२/०७/२०१० रोजी या मंचात तक्रार दाखल करुन सुधारीत वीज देयक देण्याबाबत,व झालेल्या मानसिक त्रासापोटी रुपये ५००/- नुकसान भरपाई देण्याबाबत महावितरण कंपनीस आदेश देण्याबाबत मंचास विनंती केली.

२) वरील तक्रारीची सुनावणी दिनांक २०/०७/२०१० रोजी घेण्यात आली, तक्रारीच्या दरम्यान नोडल अधिकारी श्री भारती, श्री खडके सहाय्यक लेखापाल व वीज ग्राहक श्री कुलकर्णी हजर होते.ग्राहकाने आपली तक्रार वरील प्रमाणे कथन केली.नोडल अधिकारी यांनी आपले लेखी जबाबासोबत ग्राहकाचे सी.पी.एल., मीटर बदली अहवालाच्या प्रति सादर केल्या. त्यांच्या जबाबानुसार ग्राहकाचे मीटर माहे मार्च २००८ रोजी प्रथम बदली करण्यात आले.त्या मीटरवर असलेले शिल्लक ३०५१ युनिटचे देयक ग्राहकास ऑक्टोबर २००८ मध्ये करण्यात आले.वरील एकत्रीत युनिटचे समायोजन ७ महीन्यात केलेले आहे.त्यानंतर ग्राहकाचे मीटर दुस-यांदा माहे नोव्हेंबर २००८ मध्ये बदली करण्यात आले. ग्राहकाची तक्रार प्राप्त झाल्यानंतर त्यांने वापरलेल्या युनिटचे समायोजन जुलै २००७ ते डिसेंबर २००८ या १८ महीन्याच्या कालावधीत करुन ग्राहकास ७४१ युनिटचे व रुपये ६१२०.३३/- चे क्रेडीट माहे जुन २०१० च्या देयकात देण्यात आल्याचे सांगीतले. नोडल अधिकारी यांनी मंचात ग्राहकाचा स्थळ निरिक्षण अहवाल तसेच वरील सुधारीत वीज बिल दुरुस्ती अहवाल सादर केला.ग्राहकाने वरील वीज बिल दुरुस्ती प्रस्ताव आपणास मान्य नसुन आपण कधीही १०० युनिट पेक्षा जास्त वीजेचा वापर केलेला नाही असे सी.पी.एल.वरुन आपणास दिसुन येईल असे सांगीतले. मंचाने नोडल अधिकारी यांना माहे मार्च २००८ मध्ये बदली केलेले ग्राहकाचे मीटर क्रमांक ८३७९४० ची चाचणी करुन त्याचा अहवाल सादर करण्यास सांगुन पुढील सुनावणी दिनांक ०६/०८/२०१० रोजी ठेवण्यात आली.

३) दिनांक ०६/०८/२०१० रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी व ग्राहक उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी लेखी निवेदन करुन सांगीतले की, ग्राहकाचे वरील मीटर ड्रम प्रोजेक्ट अंतर्गत बदली करण्यात आले असुन ते सध्या चाचणी करीता उपलब्ध होऊ शकत नसल्याचे सांगीतले. त्यांनी मीटर बदली अहवाल रजिस्टरची प्रत मंचात दाखल केली. दोन्ही बाजुकडुन करण्यात आलेले निवेदन ऐकुन घेतल्यानंतर प्रकरण निकासाठी ठेवण्यात आले.

४) दोन्ही बाजूकडून मंचात दाखल झालेल्या कागद पत्रावरुन असे दिसुन येते की, ग्राहकाचे मीटर प्रथम दिनांक २८/०३/२००८ रोजी बदली करण्यात आले. वरील मीटरचा सी.पी.एल.वर मीटर क्रमांक ९००००01 असुन कनिष्ठ अभियंता यांनी सादर केलेल्या मीटर बदली अहवालावर त्याचा मीटर क्रमांक ८९०५७५९० अशी नोंद करण्यात आली आहे.त्या मीटरचे अंतिम वाचन ८७४६ असल्याची नोंद दिसुन येते तसेच त्या ठिकाणी दुसरे ८३७९४० क्रमांकाचे नविन मीटर लावण्यात आले असुन त्याचे सुरुवातीचे मीटर रिडींग ००१ असल्याची नोंद केली आहे.सी.पी.एल.वरील नोंदी नुसार ग्राहकास माहे मार्च २००८ ते सप्टेबर २००८ या कालावधीत आर.एन.ए. टेस्टस दाखवुन सरासरी ७५ युनिट आकारणीची वीज देयक देण्यात आल्याचे दिसुन येते. माहे ऑक्टोबर २००८ मध्ये नविन मीटरची आकारणी २९९ युनिट व जुन्या मीटरची समायोजित युनिट ३०५१ असे ऐकुन ३३५० युनिटचे रुपये १४९९६.३७/- चे देयक देण्यात आल्याचे दिसुन येते.तसेच माहे ऑक्टोबर व डिसेंबर २००८ मध्ये ग्राहकास अनुक्रमे ४७८ व ९५६ युनिटची मीटर फॉल्टी टेस्टस दाखवुन आकारणी केल्याचे दिसुन येते. नोडल अधिकारी यांनी दिनांक २४/११/२००८ रोजी बदली केलेल्या, मीटर बदली अहवालाची प्रत सादर केलेली आहे त्यानुसार जुन्या मीटरचा क्रमांक ९१४५९ व अंतिम वाचन ३७४ युनिट असे दाखविण्यात आले असुन नविन मीटरचा क्रमांक ९५२०८३ व वाचन ००२ युनिट दाखविण्यात आले आहे. प्रत्यक्षात दिनांक २८/०३/२००८ रोजी लावण्यात आलेले नविन मीटरचा क्रमांक ८३७९४० असतांना दिनांक २४/११/२००८ रोजी बदली केलेल्या जुन्या मीटरचा क्रमांक (९१४५९) कसा राहु शकतो. याबाबतीत नोडल अधिकारी नोडल अधिाकारी स्पष्टीकरण सादर करु शकले नाहीत.

५) सादर केलेल्या कागद पत्रावरुन ग्राहकाची तक्रार ही दिनांक २८/०३/२००८ रोजी बदली करण्यात आलेल्या अंतिम वाचनावरुन निर्माण झाल्याचे दिसुन येते. नोडल अधिकारी यांना दिनांक २८/०३/२००८ रोजी बदली केलेल्या मीटरची चाचणी करुन त्याचा अहवाल मंचात सादर करण्याचे सांगीतले असता मीटर उपलब्ध नसल्याचे कारण सांगुन मीटर चाचणी अहवाल सादर करु शकले नाहीत.ग्राहकाच्या सी.पी.एल.चे निरिक्षण केले असता मार्च २००८ पुर्वी व डिसेंबर २००८ नंतर म्हणजे मीटर योग्य स्थितीत असल्याचे कालावधीत ग्राहकाचा वीज वापर सरासरी १०० युनिट प्रति महा असल्याचे अढळुन येते तसेच मार्च २००७ ते मार्च २००८ या १२ महीन्याच्या कालावधीत दरमहा रिडींग घेवुन वीज देयक दिले असतांना,मार्च २००८ मध्ये मीटर बदली करतांना ३०५१ युनिट शिल्लक कसे राहीलेत याबाबत सुध्दा नोडल अधिकारी समाधान करु शकले नाहीत.

६) वरील प्रत्यक्ष परीस्थीतीवरुन व मीटर बदली अहवालानुसार ग्राहकाच्या दिनांक २८/०३/२००८ रोजी बदली केलेल्या जुन्या मीटरचा नंबर चुकीचा असल्यामुळे ग्राहकाचे घेतलेले अंतिम वाचन ८७४६ युनिट ग्राह्य धरणे योग्य होणार नाही त्यामुळे माहे ऑक्टोबर २००८ चे देयकात ३०५१ समायोजित युनिटची केलेली आकारणी योग्य नसल्यामुळे ती रद्द करण्यात यावी असे मंचाचे मत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने ग्राहकास माहे एप्रिल ते डिसेंबर २००८ या कालावधीमध्ये दिलेली सर्व वीज देयके रद्द करण्यात येत आहे.

२) त्याऐवजी एप्रिल २००८ ते नोव्हेबर २००८ या कालावधीकरीता २७४ युनिटचे विभागणी करुन वीज देयक द्यावे तसेच माहे डिसेंबर २००८ करीता नविन मीटरचे वाचणानुसार १३७ युनिटचे वीज देयक देण्यात यावे.

३) वरील सुधारीत वीज देयकात कोणतेही व्याज व दंडाची आकारणी करु नये.

४) वरील कालावधीत ग्राहकाने भरणा केलेल्या वीज देयकाच्या रक्कमेचे समायोजन करावे.

वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.

**प्र. अ. सगणे**
**सदस्य/सचिव**

**विलासचंद्र सु. काबरा**
**सदस्य**